**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २७.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०७.२०२६ चे ०१.२० वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत, रामनगर मेन रोड, भगवती हाईटस्, सहावा माळा, येथील रिदम ॲन्ड वाईन बार ॲन्ड रेस्टारेंट (तमाशा) येथे बारमालक १) हेमंत राजकुमार गुरुबक्षानी वय ३३ वर्ष रा. ऑटोमोटीव्ह चौक, कपीलनगर, नागपूर २) व्यवस्थापक ब्रिजेश ब्रिजप्रसाद पाल वय ३६ वर्ष रा. डब्ल्युसीएल कॉलनी, सावनेर हे त्यांचे रेस्टारेंटमध्ये ग्राहकांना आतमध्ये बंद करुन ठेवल्याचे मिळून आले. आरोपी हे अवैधरित्या हुक्का पार्लर चालवून स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता ग्राहकांचे जिवीतास अपायकारक असलेले तंबाखुजन्य पदार्थ अवैधरित्या पुरवितांना मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण ८,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक व मॅनेजर विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम १२७(२), २७४ भा.न्या.सं सहकलम ५,६,७,२०, सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनियम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दिपक अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनोद गोडबोले पोउपनि. राजेश लोही व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.

**२) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या ०२ आरोपींना अटक.**

पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट नं. ४५३, गमदुर बार मागे, सिदधार्थ नगर येथे राहणारे फिर्यादी जिलानी युनुस कलीवाला वय ५० वर्षे हे दिनांक १६.०७.२०२६ चे ०९.०० वा. आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह अजमेर शरीफ येथे गेले होते. फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर घराचे मागील दार उघडे दिसल्याने, त्यांनी मोबाईलवरुन सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता, दिनांक १९.०७.२६ चे ०२.३० ते ०५.०० वा. चे दरम्यान, अज्ञात ०३ चोरट्यांनी फिर्यादीचे घराचे बाथरुमचे व्हेंटीलेशन खिडकी तोडून, आत प्रवेश करुन, चोरी केल्याचे दिसले. फिर्यादी यांनी घरी येऊन चेक केले असता, चोरटयांनी बेडरुममधील कपाटातील रोख ५,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १७,५१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करुन आरोपी १) हिमांशु हरीदास लोखंडे वय २३ वर्षे रा. गली क्र. ९, लष्करीबाग, पाचपावली नागपुर २) विवेक उर्फ विक्की युवराज धोटे वय २३ वर्षे, रा. ५०/१२, संजीवनी क्वॉटर्स, गली क्र. १, यशोधरानगर, नागपुर यांना व एका विधीसंघर्षग्रस्त

बालकास ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन रोख २,४८,५००/— रु., गुन्हा करतांना वापरलेली सुझुकी बर्गमन गाडी क्र. एमएच ३१ जीएफ ०८६७ व एक लोखंडी कटौनी असा एकुण ३,२८,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, पोनि. गुन्हे विवेक पडधान, पोउपनि रंजीत माजगावकर, अक्षय ठोरमले, पोहवा. रविंद्र राऊत, मुकेश यादव, सुशिल रेवतकर, राजकुमार पाल, पोअं. युनुस खान, अमित ठाकूर, महेंद्र सेलोकर यांनी केली.



**<u>३) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक १५.०७.२०२६ चे ०२.०० वा. ते दि. २३.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, हजारी पहाड, वायुसेना, सुभाष किराणा स्टोअर्स येथे राहणारे फिर्यादी साकेत सुभाष खडगी, वय २० वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह राजस्थान येथे फिरण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, देवघरातील आलमारीचे लॉकरमधील रोख २,००,०००/—रू. चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करुन आरोपी १) गणेश उर्फ गणु विनोद बघेल वय १९ वर्षे रा. तेलंगखेडी, बागडीचे घराजवळ, अंबाझरी, नागपुर २) मनिष नानु नरेंद्र जयस्वाल वय २० वर्षे, रा. हजारीपहाड, महेश आटा चक्कीजवळ, गिट्टीखदान, नागपुर यांना व एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन रोख १४,६००/— रु., चोरीचे पैशांतुन विकत घेतलेले ०२ आयफोन, तसेच गुन्हा करतांना वापरलेली हिरो होंडा मोटर सायकल क्र. एमएच ३१ एडब्ल्यू ८३०० असा एकुण १,१२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उपआयुक्त, परि.क्र. २, मा. श्री सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्रीमती ललिता तोडासे, सपोनि. चेतन बोरखेडे, बालाजी लालपालवाले, पोउपनि दीपक

इंगळे, सफौ. अनिल त्रिपाठी, पोहवा. अजय यादव, दीनेश आगरकर, मंजितसिंग, दयाशंकर बिसांद्रे, विशाल नांदेकर, पोअं. राहुल पांडे, अविनाश पांडे, सचिन खडसे, नागनाथ कोकरे व आकाश लोथे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०७.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, पॅनथॉन सोसायटी, आश्रय अपार्टमेंट समोर, सिमेंट रोड, मनिषनगर येथे फिर्यादीचे भावाचे गजानन डेली निडस् नावाचे दुकान आहे. त्यांचे भावाचा मुलगा श्रेअंश पकंज आष्टनकर वय अडीच वर्ष हा दुकाना समोरील पार्कीगमध्ये उभा होता. तेथे महेंद्रा कंपनीची कार क्र. एमएच ४९ डीडब्लयू ६३६८ ही येऊन थांबली. मुलगा श्रेअंश पार्कीगमधून कारचे बाजुने घरी जात असता, चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील कार निष्काळजीपणे व हयगयीने वेगाने पुढे चालवुन श्रेअंश यास धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी मुलाला उपचाराकरीता तायवाडे हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी दर्शन रामकृष्ण आष्टनकर वय ३९ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३, तपोवन कॉम्प्लेक्स, जयप्रकाश नगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे कार चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०३, नागपुर. | ३०४०१९ ७/२००४ | कलम ४१९, ४२०,१७०, १७१,३८४, ४६८,४७१, ४७३ भा.दं.वि. | शाहनवाज खान मोहम्मद खान असलम खा उर्फ शमीर वय ३५ वर्ष रा. वार्ड नं. १, चिचोली, खापरखेडा, नागपुर | ०४.०८.२०२६ |
| २ | मा. जिल्हा न्यायाधीश —१७ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | १०५४/ २०२५ | कलम ३५३, १६८ भादंवि | जावेद यासीन अली सैयद वय २५ वर्ष रा. मोमीनपुरा, पावर हाऊसजवळ, नामदेव भाजीवाले च्या घरी, तहसील नागपूर ह.मु. | ३१.०७.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आदर्श नगर, ताजबाग, सक्करदरा, नागपूर | |
| ३ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट कं. ०६, नागपुर. | ३०८०००८ ४/२०२४ | कलम ३०४, ४२७ भा.दं.वि. | रामबदन दुर्गाप्रसाद चौधरी रा. कामठी कॉलनी नं. ३, कामठी, नागपुर | २९.०७.२०२६ |
| ४ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट कं. ०६, नागपुर. | ३०८०१० ९/१९९८ | कलम १४७, १४९,३५३, ३३२ भा.दं.वि. | १) शामलाल रामचंद्र पटले वय ५८ वर्ष रा. श्रीवास नगर झोपडपट्टी, कोराडी,नागपुर<br>२) पांडुरंग तुलाराम अडकणे वय ३० वर्ष<br>३) दिलीव उरकुडा कोल्हारकर वय ३२ वर्ष<br>४) सुरेश किशोरदास सुर्यवंशी वय २२ वर्ष सर्व रा. सेवानंद झोपडपट्टी, कोराडी, नागपूर | २९.०७.२०२६ |
| ५ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट कं. ०६, नागपुर. | ३०८०३९ ९/१९९९ | कलम ३२५, ३४ भा.दं.वि. | १) चंपालाल कन्हैयालाल बल्लारे रा. श्रीवास नगर झोपडपट्टी, टॉवर नं. २ जवळ, कोराडी,नागपुर<br>२) रुपचंद तिजु हनवते रा. श्रीवास नगर झोपडपट्टी, मजिस्दमागे, कोराडी,नागपुर<br>३) छोटू शामलाल पटले रा. श्रीवास नगर झोपडपट्टी, कोराडी,नागपुर | २९.०७.२०२६ |
| ६ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट कं. ०६, नागपुर. | ३०८०२७ ८/२००० | कलम ३२६,३४ भा. दं.वि. | १) बालेश्वर प्रसाद कल्लन महतो<br>२) सौ. शकुंतला बालेश्वर प्रसाद महतो<br>३) धनेश्वर कल्लन महतो सर्व रा. प्लॉट क्र. १२, वानखेडे ले आऊट, चेतना अपार्टमेंट जवळ, मानकापूर, नागपुर | २९.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**